# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः02.12.2024** **वारःसोमवार**

---

1. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठी राष्ट्रीय पुरस्कार वितरण
2. सायबर गुन्हे आणि कृत्रिम बुद्धीमत्तेमुळं निर्माण झालेल्या आव्हानांकडं पोलिस यंत्रणांनी संधी म्हणून पाहावं- पंतप्रधानांचं आवाहन
3. प्लास्टीक प्रदूषणाचा सामना करण्यासाठी कराराला अंतिम रुप देण्याकरिता भरलेल्या आंतरसरकारी वाटाघाटी समितीच्या जागतिक बैठकीचा कराराविना समारोप
4. राज्याच्या मुख्यमंत्रीपदाबाबत भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांचा निर्णय मान्य असेल-काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा पुनरुच्चार आणि
5. कनिष्ठ आशिया करंडक हॉकी स्पर्धेत भारत उपांत्यफेरीत, उद्या मलेशियाशी सामना

**<u>राष्ट्रपती पुरस्कार</u>**

आंतरराष्ट्रीय दिव्यांग व्यक्ती दिनानिमित्त आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठी राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. यावेळी एकूण 22 व्यक्ती आणि 11 संस्थांना राष्ट्रीय पुरस्कार देण्यात येणार आहेत. यावेळी सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्री डॉ. वीरेंद्र कुमार यांच्या हस्ते दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठी अनेक कल्याणकारी उपक्रमांचा आरंभ करण्यात येणार आहे. सर्वश्रेष्ठ दिव्यांगजन श्रेणीतील वैयक्तिक उत्कृष्टतेसाठी राष्ट्रीय पुरस्कार पूर्ण अंधत्व असलेले कायदेतज्ज्ञ (वकील) अमर जैन आणि 75 टक्के अपंगत्व असलेले प्रतीक खंडेलवाल यांना देण्यात येणार आहे. प्रतीक खंडेवाल यांनी शहरांमध्ये दिव्यांग व्यक्तींसाठी आवश्यक सुविधा उभारण्यात मदत करण्यासाठी 'रॅम्प माय सिटी' हे स्टार्ट-अप सुरू केलं आहे.

**<u>महानिरीक्षक परिषद</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी डिजिटल फसवणूक, सायबर गुन्हे आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स अर्थात कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान यासारख्या धोक्यांमुळं निर्माण झालेल्या आव्हानाचं संधीत रूपांतरित करण्याचं आवाहन पोलिसांना केलं आहे. यासाठी कृत्रिम बुद्धीमत्ता आणि 'एस्पिरेशनल इंडिया' मधील देशाच्या बलस्थानांचा उपयोग करून घ्यावा, असंही त्यांनी पोलिसांना सांगितलं. भुवनेश्वर इथं आयोजित अखिल भारतीय महासंचालक आणि पोलीस महानिरीक्षक परिषदेचा समारोप काल पंतप्रधानांच्या उपस्थितीत झाला. त्यावेळी ते बोलत होते. तीन दिवस चाललेल्या या परिषदेच्या समारोपाप्रसंगी पंतप्रधानांनी विविध राज्यं तसंच केंद्रशासित प्रदेशांच्या सुरक्षेशी संबंधित महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा केली. सायबर गुन्हे, किनारपट्टीलगतची सुरक्षा, देशाच्या विकासात अडथळा आणणाऱ्या बाबी, सीमेपलीकडून होणारा दहशतवाद आणि तस्करी, देशांतर्गत नक्षलवादाचं आव्हान आदी विविध मुद्यांवर यावेळी चर्चा करण्यात आली. या परिषदेला केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, केंद्रीय गृहसचिव गोविंद मोहन, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवालदेखील उपस्थित होते.

**जीएसटी संकलन**

देशात नोव्हेंबरमध्ये वस्तू आणि सेवा कर अर्थात जीएसटी संकलन 1 लाख 82 हजार कोटी रुपये झालं आहे. गेल्या वर्षीच्या याच महिन्याच्या तुलनेत त्यात 8.5 टक्क्यांनी वाढ झाली आहे. गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये एकूण 1.68लाख कोटी रुपये जीएसटी जमा झाला होता. सरकारनं काल ही आकडेवारी जाहीर केली. यंदा नोव्हेंबरमध्ये जमा झालेल्या एकूण जीएसटी मध्ये केंद्रीय जीएसटी संकलन 34 हजार 141कोटी रुपये, राज्य जीएसटी 43 हजार 47 कोटी रुपये, एकात्मिक जीएसटी 91 हजार 828 कोटी रुपये तर उपकर 13 हजार 253 कोटी रुपये आहे. देशांतर्गत विक्रीतील वाढ आणि कायदेपालनातील वाढीमुळे ऑक्टोबरमध्ये आतापर्यंतचे दुसरे सर्वोच्च 1 लाख 87 हजार कोटी रुपये जीएसटी संकलन झाले होते.

**यूपीआय**

युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस अर्थात यूपीआयद्वारे या वर्षी ऑक्टोबरमध्ये 16 अब्ज 58 कोटींहून अधिक व्यवहार झाले आहेत. ऑक्टोबरमध्ये 16.58 अब्ज व्यवहारांचे मूल्य सुमारे 23 कोटी 49 लाख रुपये आहे. गेल्या वर्षीच्या ऑक्टोबरच्या तुलनेत यात वार्षिक 45 टक्के वाढ झाली आहे. अर्थ मंत्रालयानं काल ही आकडेवारी जाहीर केली. नॅशनल पेमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडियानं 2016 मध्ये ही सुविधा दाखल केली. यात अनेक बँक खाती एकाच मोबाईल ॲपमध्ये सामायिक करून डिजिटल पद्धतीनं आर्थिक व्यवहार करणं सहजशक्य झालं आहे. यामुळं रोखविरहित अर्थव्यवस्थेकडे देशाची वाटचाल सुरू आहे. या पेमेंट इंटरफेस आंतरराष्ट्रीय पातळीवरही पसंती मिळाली असून संयुक्त अरब अमिराती, सिंगापूर, भूतान, नेपाळ, श्रीलंका, फ्रान्स आणि मॉरिशस अशा सात देशांमध्येही ही सुविधा वापरली जात आहे.

**प्लॅस्टिक प्रदूषण**

जगभरात प्लॅस्टिक प्रदूषणाचं आव्हान गंभीर होत असून, त्याचा विपरीत परिणाम अर्थव्यवस्थांवर विशषतः विकसनशील अर्थव्यवस्थांच्या विकासावर होत आहे. त्यामुळं प्लॅस्टिक प्रदूषण आणि शाश्वत विकास यात संतुलन राखण्याची गरज आहे. त्यासाठी सर्व देशांनी परस्परविश्वास आणि सामंजस्यानं उपाययोजना करण्याचं आवाहन भारतानं केलं आहे. दक्षिण कोरियातील बुसान इथं सुरू असलेल्या आंतरसरकारी वाटाघाटी समितीच्या पाचव्या सत्राच्या अंतिम चर्चेदरम्यान भारतानं आपली भूमिका स्पष्ट केली. प्लास्टीक प्रदूषणाचा सामना करण्यासाठी कराराला अंतिम रुप देण्याकरिता भरलेल्या या दोनशे सदस्यांचा समावेश असलेल्या समितीच्या जागतिक बैठकीचा समारोप कराराविना झाला. प्लास्टीक प्रदूषणावर कायद्यानं बाध्य कराराचा मसुदा करण्यासाठी ही समिती 2022 पासून काम करत आहे. प्लास्टीक उत्पादन आणि हानीकारक रसायनांवर मर्यादा घालण्याची मागणी काही देश करत आहेत तर केवळ प्लास्टीक कचऱ्याचं व्यवस्थापन करण्यावरच काही देशांचा भर आहे. कराराची गाडी या मतभेदावर अडली आहे. प्लॅस्टिक पॉलिमरच्या उत्पादनाचं नियमन करण्यासाठी कोणत्याही उपाययोजनांना पाठिंबा देण्यास आपण असमर्थ असल्याचं भारतानं स्पष्ट केलं. यामुळं सदस्य देशांच्या विकासाच्या अधिकारावर मोठा परिणाम होऊ शकतो, असं भारतानं म्हटलं आहे. विकसनशील देशांना नियमपालनाच्या जबाबदारीसाठी वाढीव खर्चाची पूर्तता करण्यासाठी स्वतंत्र बहुपक्षीय निधीची गरज असल्याचंही भारतानं नमूद केलं.

**महाराष्ट्र-मुख्यमंत्री**

महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाबाबत भाजपाचे वरिष्ठ नेते जो निर्णय घेतील तो आपल्याला मान्य असेल असा पुनरुच्चार काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल केला. दोन दिवसांपूर्वी मुख्यमंत्री सातारा जिल्ह्यातील दरे या आपल्या मूळ गावी आले होते. तिथून मुंबईकडे परतण्यापूर्वी त्यांनी माध्यमांशी संवाद साधला.

**ईव्हीएम**

महाराष्ट्रात नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत ईव्हीएम अर्थात इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांमध्ये गैरव्यवहार झाल्याचे खोटे दावे करणाऱ्या व्यक्ती किंवा संस्थांवर कठोर कारवाई करण्याचा इशारा राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी, एस. चोकलिंगम यांनी दिला आहे. ईव्हीएम गैरव्यवहारांबद्दल महाराष्ट्र विकास आघाडीच्या नेत्यांकडून सतत आरोप केले जात आहेत, त्याचवेळी चोकलिंगम यांनी हे विधान केलं आहे. या प्रकरणी अधिकारी सखोल तपास करत आहेत, असंही त्यांनी नमूद केलं. परदेशात वास्तव्यास असलेल्या आणि ईव्हीएममध्ये घोटाळा झाल्याचा आरोप करणारी पत्रं पाठवणाऱ्या सय्यद शुजा यांच्या विरोधात निवडणूक आयोगानं गुन्हा दाखल केला आहे,असंही चोकलिंगम यांनी स्पष्ट केलं.

**महाकुंभ**

उत्तर प्रदेशच्या प्रयागराजमध्ये 13 जानेवारी ते 26 फेब्रुवारी दरम्यान महाकुंभ मेळा होणार असून 43 कोटींहून अधिक भाविक या सोहळ्याला हजेरी लावतील, अशी अपेक्षा आहे. या भाविकांच्या सुविधेसाठी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी उत्तर प्रदेशातल्या रस्ते आणि पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या प्रगतीचा आढावा घेतला.

**फेंजल**

तामिळनाडूच्या उत्तर किनाऱ्यावरील फेंजल चक्रीवादळाची तीव्रता कमी झाली असून, ते आज वायव्येकडे सरकण्याची आणि उत्तर तमिळनाडूवर कमी दाबाच्या क्षेत्रात हळूहळू कमकुवत होण्याची शक्यता आहे. मात्र, या चक्रीवादळामुळं केरळ, तामिळनाडू आणि दक्षिण कर्नाटकात आज मुसळधार पावसाचा अंदाज हवामान खात्यानं वर्तवला आहे. दरम्यान, फेंजल चक्रीवादळामुळं पुद्दुचेरी इथं गेल्या तीस वर्षांतील सर्वाधिक पाऊस पडल्यानं जनजीवन विस्कळीत झालं आहे. ते पूर्वपदावर येण्यास काही दिवस लागण्याची शक्यता आहे. काल संध्याकाळी पाऊस थांबल्यानंतर बचाव आणि मदत कार्याला वेग आला आहे. भारतीय लष्कर, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल युद्धपातळीवर बचावकार्य करत आहे.

**हॉकी**

ओमान मधील मस्कत इथं सुरू असलेल्या कनिष्ठ आशिया करंडक हॉकी स्पर्धेत काल रात्री झालेल्या सामन्यात भारतानं दक्षिण कोरियाचा 8-1 असा पराभव करत अ गटात अव्वल स्थान मिळवलं आहे. उपांत्य फेरीत भारताचा सामना उद्या मलेशियाशी होणार आहे.

**बुद्धिबळ**

सिंगापूर इथं सुरू असलेल्या आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेत काल भारतीय ग्रँड मास्टर डी. गुकेश आणि चीनचा खेळाडू डिंग लिरेन यांच्यातील सामना सहाव्या फेरीतही बरोबरीत राहिला. दरम्यान, भारताचा 21 वर्षीय ग्रँड मास्टर अर्जुन एरिगैसीनं 2800 यलो गुणांकन मिळवलं असून, हे गुणांकन गाठणारा विश्वनाथन आनंद नंतरचा तो दुसरा भारतीय खेळाडू आहे. या गुणांकनासह अर्जुन एरिगैसी हा जागतिक बुद्धिबळ क्रमवारीत चौथ्या क्रमांकावर पोहोचला आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.